# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/४८/२०१४-१५/२२४ दिनांक : ३१.१०.२०१४

**<u>आदेश केस क्र.४८/१४-१५</u>**

ग्रंथपाल / सेक्रेटरी, - अर्जदार
महात्मा फुले मोफत वाचनालय,
बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय,सांगली.

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर

३) उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय १, इस्लामपूर

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

ग्रंथपाल/ सेक्रेटरी, महात्मा फुले मोफत वाचनालय, मु.पो.बोरगांव, ता.वाळवा, जि. सांगली या ग्राहकाने दि ०२.०८.२०१४ रोजी अ नमुन्यात आपली तक्रार मंचाकडे दाखल केली आहे. मंचाने सदरची तक्रार दाखल करुन घेऊन वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागवून दि. ०५.०९.२०१४ रोजी मंच कार्यालय, कोल्हापूर येथे सुनावणी घेतली.

सुनावणीचेवेळी सदर संस्थेचे प्रतिनिधी म्हणून श्री. आनंदराव दत्तात्रय शिंदे उपस्थित होते, तसेच वि.प.चेही प्रतिनिधी उपस्थित होते. ग्राहकाने व वि.प.ने सादर केलेली कागदपत्रे, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचा निर्णय, सुनावणी दरम्यानची कथने व म्हणणे या सर्वांचा विचार करता, ग्राहकाच्या मागणीचे सर्वसाधारण स्वरुप तसेच त्याबाबतची वि.प.ची भूमिका खालील प्रमाणे दिसून येते.

तक्रारदाराच्या मागणीचे स्वरुप

महात्मा फुले मोफत वाचनालय या संस्थेचा ग्राहक क्र. २८४१४०००३१८१/१ असा आहे. सदर संस्थेस वीज शुल्क माफी मिळावी म्हणून ग्राहकाने प्रथमतः उप विभाग इस्लामपूर-१ यांच्याकडे त्यानंतर मुख्य कार्यालय, मुंबई यांचेकडे अर्ज केल्याचे अर्जातील तपशिलावरुन तसेच सादर कागदपत्रावरुन दिसून येते. उप विभाग इस्लामपूर-१ यांनी वीज शुल्क माफीचा दाखला हजर केल्यावर आपणांस शुल्क माफी मिळेल असे पत्र क्र. २४३० दि. ०९.०५.२०१३ ने कळविले आहे. ग्राहकाने मुख्य अभियंता (विद्युत) यांना अग्रेषित केलेले पत्र वि.प.च्या मुख्य कार्यालयास जावक क्र. ०९/१३-१४ दि.२८.०५.२०१३ ने पाठविल्याचे दिसून येते. तसेच महाराष्ट्र शासनाच्या विद्युत निरीक्षण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्याशी पत्र-व्यवहार केल्याचे दिसून येते. त्या संबंधीच्या पत्र-व्यवहाराची प्रत तक्रारदार यांनी आपल्या तक्रारीत जोडल्याचे दिसून येते. ग्राहकाने आपल्या अपेक्षित मदतीच्या स्वरुपात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग, शासकीय परिपत्रक क्र. १०९६/७७/१३.३.९६ चा उल्लेख करुन तक्रारीची दखल १५ दिवसांत घेतलेली नाही. तसेच मागणी केलेल्या दाखल्याकडे हेतु:पुरस्सर दूर्लक्ष केले. त्यांचेवर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई व्हावी. तसेच सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन विद्युत शुल्क माफीचा दाखला न मिळाल्याने प्रति दिवसास रु. २५०/- प्रमाणे दंडात्मक कारवाई व्हावी, विद्युत शुल्क माफीचा दाखला मिळावा तसेच वीज शुल्क सोडून वीज देयके भरणेस तयार असलेबाबत अर्ज करुनसुध्दा अर्जदार यांचा दि. ०६.०१.२०१४ रोजी बेकायदेशीररित्या विद्युत पुरवठा बंद केला. अर्जदार यांचे पैसे शिल्लक असतांना वीज बंद करावी ही बेकायदेशीर बाब असल्याचे जाहीर व्हावे इ. मागण्या अर्जदाराने केल्याचे दिसून येते.

वितरण कंपनीची भूमिका व कार्यवाही

सदर अर्जदार यांच्या दि. २२.०२.२०१२ च्या अर्जास पत्र क्र. २४३० दि. ०९.०५.२०१३ ने सविस्तर उत्तर पाठवून वाणिज्य परिपत्रक क्र. २६४ - मुअ(वा)/लेखा/विद्युत शुल्क/०७/२१३२९ दि. २६.०७.२०१२ नुसार मुख्य अभियंता (विद्युत) यांचेकडून विद्युत शुल्क माफीचे पत्र घ्यावे. त्यानुसार वीज शुल्क फी माफी करता येईल असे लिहीलेले आहे. तथापि, ग्राहकाने मुख्य अभियंता (विद्युत) असे लिहून महावितरणच्या मुख्य कार्यालयास दि. २८.०५.२०१३ रोजी पत्र लिहीले आहे. त्यामुळे ग्राहकाचा गैरसमज झाल्याचे दिसून येते. वास्तविक ग्राहकाने आपले पत्र मुख्य अभियंता (विद्युत) मुंबई यांच्याकडे म्हणजेच विद्युत निरीक्षण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते, तसे न झाल्याने अद्यापही दाखला मिळालेला नाही व वीज शुल्क माफी देता आलेली नाही. विद्युत विभाग यांनी शासन निर्णय क्र. इएलडी/२०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा-१ दि. ०५.०७.२०१३ ने वीज शुल्क माफी संबंधात त्यातील अधिकार महावितरणकडे देण्यात आल्याचे कळविले आहे. अर्जदार यांच्या अर्ज दि. २८.०५.२०१३ चा असल्याने व सदरचा निर्णय दि. ०५.०७.२०१३ रोजी झाला असल्याने माफीचा दाखला मिळाला नसल्याने हेतु:पुरस्सर कोणतीही कार्यवाही अथवा हलगर्जीपणा केला नसल्याने ग्राहकाचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती वि.प.ने केली आहे.

कारणमिमांसा

अर्जदार यांनी वीज शुल्क माफी परतावा मिळणेबाबत योग्य ठिकाणी माहिती घेऊन अर्ज न केल्यामुळे त्यांना बराच पत्र-व्यवहार करावा लागला आहे. अर्जदार यांचा वि.प.कडील दि.२२.०२.२०१२ चा वीज शुल्क माफी संदर्भातील अर्ज व त्या संदर्भात वि.प.ने दिलेले उत्तर यातून पूर्ण खुलासा होत आहे. तथापि, गैरसमजातून अर्जदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल करुन वेगवेगळया मागण्या पुढे केल्या आहेत. वीज शुल्क माफी दाखला जो पर्यंत मिळत नाही तो पर्यंत सदर रक्कम वजावट करुन बील भरुन घेतले जाणार नाही, ही वि.प.ची भूमिका योग्य वाटते व त्या संदर्भातील अर्जदार यांनी वीज शुल्क माफी रक्कम आपणाकडे जमा असतांना विद्युत पुरवठा बंद केला हे म्हणणे न्यायास धरुन नाही असे मंचाचे मत झाले आहे. तसेच मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांनी अग्रेषित केलेल्या पत्र क्र. २१३२९ दि. २६.०७.२०१२ च्या पत्रातील मजकूर बारकाईने वाचल्यावर वीज शुल्क माफी संदर्भात मुख्य अभियंता (विद्युत) म्हणजेच शासनाचा विद्युत निरीक्षण विभाग यांच्याकडून वीज शुल्क माफीचे पत्र मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. तसेच विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग, कोल्हापूर यांनी पत्र क्र. २२४२ दि. ०१.०८.२०१४ ने सदरचे अधिकार दि. ०५.०७.२०१३ पासून वि.प.कडे दिल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे अर्जदाराच्या अर्जाचा दिनांक पहाता, अर्जदाराने पुन्हा वितरण कंपनीचे मुख्य कार्यालयाकडे अर्ज करुन तसा दाखला घ्यावा. सबब सर्व बाबींचा व कागदपत्रातील मजकूराचा विचार करुन सदरची तक्रार निकाली ठेवण्यात येत आहे.

मंच कार्यालयातील स्टेनोग्राफर दि.३१.०८.२०१४ रोजी सेवानिवृत्त झाले. दि. ०५.०९.२०१४ व ०६.०९.२०१४ रोजी इतरही तक्रारींची सुनावणी घेण्यात आली, त्यातील ८ आदेश व श्री. खापरे यांचे ५६ ते ६१ या तक्रारीतील सुनावणी दि. ०८.१०.२०१४ ला झाल्यानंतर प्रत्यक्षात स्टेनो कार्यालयात दि. ०८.१०.२०१४ पासून नियुक्त झाले. दरम्यानच्या काळात स्टेनो नसल्याने प्रस्तुत तक्रार २ महिने मुदतीत निकाली काढणेत आली नाही.

## **आदेश**

१) कारणमिमांसेतील विवेचनाप्रमाणे सदरची तक्रार निकाली ठेवण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : ( जी. सी. लेले )

सदस्य

बी. जी. पवार, अध्यक्ष .. सही/-

जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.